# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते,
## कस्तुरबा रुग्णालय.

क्र.एचओ/6278/ केएच दि. 09/10/2024

## सूचना

कस्तुरबा रुग्णालयाच्या आस्थापनेवरील प्रयोगशाळा तंत्रज्ञ संवर्गातील 4 पदे कंत्राटी पध्दतीने 1वर्षाच्या कालावधीकरिता किंवा प्रयोगशाळा तंत्रज्ञ संवर्गाची पदे नियमित तत्वावर भरेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल ते या कालावधीकरुता निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात (दर 6महिन्यांनी 1 दिवसांचा खंड देवून ) भरण्यासाठी दिनांक 10.10.2024 ते 16.10.2020 रोजी 4.00 वाजेपर्यंत खाली नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अर्हता –**

1) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील (Degree in B. Sc.) पदवी धारण करणारा असावा

आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची (MSBT)ची / डी.एम.एल.टी. (D.M.L.T.) पदविका उत्तीर्ण असावा.
(B.Sc. + D.M.L.T.)

**किंवा**

2) उमेदवार 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांचेकडील निम वैद्यकीय तंत्रज्ञान या शाखेतील लॅबोरेटरी मेडीसीन या विषयातील (Bachelor of Paramedical Technology in Laboratory Medicine) पदवी धारण करणारा असावा.

**कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती खालील अटी व शर्तीनुसार राहील**

1) कंत्राटी तत्वावर नियुक्त होणारे प्रयोगशाळा तंत्रज्ञ हे तत्सम पदाकरिता विहित केलेल्या अर्हता धारण करणारे असावेत.

2) कंत्राटी तत्वावर नियुक्त होणाऱ्या प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना महानगरपालिकेच्या नियमित सेवेसाठी हक्क सांगता येणार नाही.

3) कंत्राटी तत्वावरील प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना दरमहा रु. 20000/- इतके मानधन देण्यात येईल. त्यांना अन्य कोणत्याही प्रकारचे भत्ते दिले जाणार नाहीत.

5) नेमणूकीच्या विहित कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी नियुक्त केलेल्या प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांची राहील व तसे हमीपत्र त्यांचेकडून घेण्यात येईल.

6) कराराच्या कालावधीत संबंधित प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना कोणतेही प्रशासकीय अथवा आर्थिक संबंधात अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.

7) कराराच्या कालावधीत सदर प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीतील नियम लागू राहणार नाहीत. ही नेमणूक केवळ कंत्राटी पध्दतीवर राहील.

8) कंत्राट पद्धतीने काम करणाऱ्या प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांचे काम कराराच्या कालावधीत असमाधानकारक असेल तर अशा प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांची कंत्राट पद्धतीवरील नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता संपुष्टात आणण्यात येईल.

9)सदरची नियुक्ती ही 1वर्षाच्या कालावधीकरिता किंवा प्रयोगशाळा तंत्रज्ञ संवर्गाची पदे नियमित तत्वावर भरेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल ते या कालावधीकरिता निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात (दर 6महिन्यांनी एक दिवसाचा खंड देऊन ) करण्यात येईल

10)सदर नियुक्ती धारकास रु 200/- च्या बॉडपेपरवर करारनामा या कार्यालयात सादर करावा लागेल

11) कंत्राटी कालावधीत साप्ताहिक सुट्टी व्यतिरिक्त इतर कोणत्याही रजा अनुज्ञेय राहणार नाही.

12)बृहन्मुंबई महानगरपालिका सेवानियमावली अटी व शर्तीखाली ही नेमणूक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाहनिधी अथवा तत्सम कोणत्या ही प्रकारचे लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत अथवा त्या पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून मिळणारे कोणत्याही प्रकारचे फायदे मिळणार नाही.

इच्छुक उमेदवारांनी दि. 16.10.2020 रोजी 4.00 वाजेपर्यंत वैद्यकीय अधिक्षक कस्तुरबा रुग्णालय यांचे कार्यालयात अर्ज सादर करावेत.

दिनांक 16.10.2020 नंतर येणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

सही-

**वैद्यकिय अधिक्षक**

**कस्तुरबा रुग्णालय**

D.Rutuja/Advertise/Lab Technician